नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 03/02/2021 (बुधवार)
(सकाळ)

---

## घरफोडी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत वांजरा मौदा येथे दिनांक 18/01/2021 वा. ते दिनांक 22/01/2021 चे 18.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ चंद्रकला राजु भोयर, वय 38 रा. वांजरा, ता. मौदा जि नागपुर या घराचे दाराला कुलुप लावुन दिराचे लग्न सोहळयात गेल्या होत्या. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे राहते घराचे कुलुप तोडुन आत प्रवेश केला. यानंतर आरोपीने कपाटात ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने कि. 35,000/–रु. चा मुद्देमाल चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ विजयसिंग ठाकुर 70831519935 हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावर रेल्वे उडाण पुल काटोल येथे दिनांक 01/02/2021 चे 14.00 वा. ते 14.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रिया धमेंद्र मुळे, वय 26 वर्ष, रा. नरसाळा रोड गॅस गोडाउन जवळ शंकर काटोल हि काटोल बसने नागपुर येथे जाण्याकरिता बसमध्ये बसली व बस चालु झाली. बस रेल्वे उडाण पुल काटोलजवळ कन्डॅक्टरने तिकीट देण्याकरिता आला असता फिर्यादीने पर्स मधील पैसे देत असतांनी पर्स बघितले असता पर्सची चेन खुली दिसली पर्स चेक केले असता पर्स मधील नगदी 1300/–रू. व अडीच तोळयाची सोन्याचे मंगळसुत्र किंमती 60,000/–रुपयाचे बॅगमध्ये दिसले नाही असे एकुण किंमती 61,300/– रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा प्रभुदास दलाल 9545363121 हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपी अटक

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 03 किमी अंतरावर मौजा खैरी नाला येथे दिनांक 02/02/2021 चे 12.00 वा. दरम्यान एमच–40/सीडी–0597 क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपी नामे– 1) जावेद गफफार शहा, वय 30 वर्ष, रा. खापा याने ट्रक मालक आरोपी क्र. 2) शुभम पांडुरंग सुपारे, रा. खापा याच्या सांगण्यावरून त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 4 ब्रास रेती किं. 8,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण 20,08,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस नाईक अंकुश लाखे यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक अंकुश लाखे 9923967630 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर